## आवाहन

राष्ट्रीय नवप्रवर्तन प्रतिष्ठान, भारत (विज्ञान व तंत्र विभाग, भारत सरकार) व तळागाळातील लोकांकडील नव्या कल्पनांना समाजोपयोगी स्वरुप देणे याबाबतची माहिती. सर्वसामान्य लोकांकडील नवसंकल्पनांना त्यांच्याकडील अनुभवाद्वारे लोकांच्या गरजानुरुप, वाजवी व शाश्वत अशा त-हेने विकसित करणे.

राष्ट्रीय नवप्रवर्तन प्रतिष्ठान व राष्ट्रीय स्तरावरील नाविन्यपूर्णतासाठी खालील लिंकवर क्लिक करा.

**NATIONAL INNOVATION FOUNDATION - INDIA**

**राष्ट्रीय नवप्रवर्तन प्रतिष्ठान, भारत**

जिल्ह्यातील तळागाळातील/खालच्या स्तरातील कोणत्याही व्यक्तीने अगर समूहाने ज्यात शेतकरी, कलाकार, महिला, झोपडपट्टीत राहणारे नागरिक, कर्मशाळेतील तंत्रज्ञ, विद्यार्थी, स्थानिक जनजातीचे लोक, यांनी कोणतेही सहाय्य न घेता तंत्रशुध्द नाविन्यपूर्ण संकल्पना किंवा तळागाळात विकसित झालेले पारंपारिक ज्ञान असेल तर ते मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हा नाविन्यता समितीशी संपर्क साधू शकतात व ते सदर जिल्हा नाविन्यता समितीसमोर आपल्या नाविन्यपूर्ण संकल्पना सादर करु शकतात. सदर नाविन्यपूर्ण संकल्पना कृषि, यंत्रे, शेती अगर बिगर शेती संबंधित उत्पादने, गृहोपयोगी वस्तू, वाहतूक, उर्जा निर्मिती अगर ऊर्जा बचत, श्रम कमी करणारे, रोप वाटिका विकास, मानव अगर जनावरे यांच्या उपचार पध्दतीत उपयोगी ठरतील अशा वनौषधींचा विकास किंवा इतर कोणतेही वाजवी व शाश्वत तंत्रज्ञानावर आधारित असू शकतात. सदरच्या संकल्पना ह्या कोणतेही अर्थ सहाय्य न घेता अगर विना देखरेख व कोणतेही बाह्य तांत्रिक सहाय्य न घेता पूर्णपणे स्वयंनिर्मित असावी. जिल्हा नाविन्यता समिती सदर नवीन संकल्पना मांडणा-याच्या संपर्कात राहील व ते जर खरेच नाविन्यपूर्ण व शाश्वत काम असेल तर त्याची दखल घेईल.

राष्ट्रीय नवप्रवर्तन प्रतिष्ठान - भारत ---- येथे क्लिक करा......